आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ नोव्हेंबर २०२६ - रविवार

ठळक बातम्या

- अमली पदार्थांचं व्यसन हा युवकाच्या स्वप्नपूर्तीमधला मोठा अडथळा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधे प्रतिपादन

- मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आज ज्येष्ठ नेते एम के स्टालिन आणि शरद पवार यांची भेट घेणार

- क्राईस्टचर्च क्रिकेट कसोटी सामन्यात भारताचा डाव २४६ धावांवर गुंडाळून दिवसअखेर न्यूझीलंडची दुसऱ्या डावात २४३ धावांची आघाडी

आणि

- झारखंडच्या रामगढ जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात १३ जणांचा मृत्यू

<><><><><><>

अमली पदार्थांचं व्यसन युवा वर्गाच्या स्वप्नपूर्तीतलं मोठं आव्हान बनून उभं राहिलं असल्याची जाणिव प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरच्या मन की बात कार्यक्रमातून करुन दिली. हा या कार्यक्रमाचा १४० वा भाग होता. देशात व्यसनाविरोधात समाजाचा सक्रीय सहभाग वाढत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. अनेक युवक आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर व्यसनाधीनतेवर मात करत स्वतःच्या आयुष्याला नवी दिशा देत असल्याचं अनेक उदाहरणांतून समोर आल्याचंही ते म्हणाले.

होल्ड बाईट -- MKB DRUGS

या निमित्तानं त्यांनी अशा रितीनं व्यसनाधीनतेशी लढा देऊन बाहेर पडलेल्या एका तरुणाशी दूरध्वनीवरून संवादही साधला. आयुष्यात नवं काहीतरी शिकणं वेगळा आनंद देणारं असतं आणि शिकण्याला कोणतंच वय नसतं, असं सांगत त्यांनी देशभरातल्या केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी आयगॉट कर्मयोगी या व्यासपीठावरून १७ भारतीय भाषांमध्ये ७ हजारांपेक्षा जास्त अभ्यासक्रम उपलब्ध करून दिल्याची माहिती दिली. याअंतर्गत आजवर सव्वातीन कोटींपेक्षा जास्त जणांनी २०० पेक्षा जास्त अभ्यासक्रम पूर्ण केले असल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या संचार साथी या डिजिटल व्यासपीठामुळे आता नागरिकांना

हरवलेला फोन परत मिळवण्याची सोय उपलब्ध झाल्याचं त्यांनी सांगितलं. या सुविधेमुळे देशभरातून १४ लाखांपेक्षा अधिक हरवलेले मोबाईल फोन शोधून मूळ मालकांना परत देण्यात आले आहेत, यासोबतच आर्थिक तसंच सायबर फसवणूक रोखली आहे असं त्यांनी सांगितलं. याच संदर्भात पुण्यातल्या हिमांशु सिंह यांनी संचार साथीला संशयास्पद क्रमांकांची माहिती दिल्यानं गेल्या वर्षभरात मोबाईल जोडण्या रद्द करण्यात मदत झाल्याचं उदाहरण सांगून देशभरातली अशीच उदाहरणं त्यांनी मांडली. या प्रणालीमुळे आतापर्यंत ५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त संभाव्य नुकसान टाळता आल्याची माहिती त्यांनी दिली. सर्वांनी संचार साथीबद्दलच्या माहितीचा जास्तीत जास्त प्रसार करावा आवाहनही त्यांनी केलं.

इटलीच्या व्हेनिस शहरात आयोजित व्हेनिस आर्ट बिएनाले या प्रतिष्ठित कला प्रदर्शनात भारताच्या दालनानं सर्वोत्कृष्ट दालनाचा पुरस्कार मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला. देशाच्या पारंपरिक कलांना नवं रूप देऊन सादर केलं, तर त्या संपूर्ण जगाचं मन जिंकू शकतात हे भारतीय कलाकारांनी दाखवून दिल्याचं ते म्हणाले.

गूळ आणि चॉकलेट उत्पादनांच्या निर्यातीत देशानं साध्य केलेल्या यशाचा उल्लेखही त्यांनी आजच्या मन की बातमध्ये केला. आज देशात चॉकलेट उत्पादनाच्या क्षेत्रात अनेक स्टार्टअप्स करत असलेल्या प्रयोगांमुळे शेतकरी तसंच युवा उद्योजकांसाठी नव्या संधी निर्माण होत असल्याचं ते म्हणाले. याच संदर्भानं चॉकलेट उद्योग क्षेत्राअंतर्गत देशभरातल्या प्रयोगांची उदाहरणंही त्यांनी मांडली.

फिट इंडिया अंतर्गत संडेज ऑन सायकल या उपक्रमाची शंभर पर्वं पूर्ण झाल्याचा उल्लेख करत त्यांनी क्रीडा क्षेत्रातल्या यशाबद्दलही माहिती दिली. भारतीय फुटबॉल संघानं सॅफ अजिंक्यपद स्पर्धेचं विक्रमी दहाव्यांदा पटाकवलेलं जेतेपद, बॅडमिंटनमध्ये लक्ष्य सेननं जर्मनी आणि जपानमध्ये सलग दोन सुपर फाईव्ह हंड्रेड स्पर्धांची मिळवलेली विजेतेपदं, आणि पी. व्ही. सिंधूनं हायलो ओपन जिंकून भारताच्या नावे केलेलं आणखी एक विजेतेपद याचा गौरपूर्ण उल्लेख त्यांनी केला. तेलंगणात येत्या ११ ते २२ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या आठव्या खेलो इंडिया युवा स्पर्धांसाठी त्यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

हिवाळा सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्याची काळजी घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. आहारात तेलाचा वापर दहा टक्क्यांनी कमी करावा, लठ्ठपणाच्या समस्येकडे दुर्लक्ष करू नये

आणि आहार तसं व्यायामाबाबत सजग राहावं, या आपल्या आवाहनांचं स्मरणही त्यांनी करून दिलं.

देशाच्या राज्यघटनेच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावणारे बी. एन. रावजी यांची उद्या पुण्यतिथी असल्याचा उल्लेख करुन त्यांनी श्रद्धांजलीही अर्पण केली.

<><><><><><>

बदलत्या काळानुसार भारतानं मानवी शक्तीकडून यंत्रशक्तीकडे वाटचाल करण्याची गरज संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली आहे. पुण्याजवळ खडकवासला इथं राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या दीक्षांत संचलन सोहळ्यात आज ते बोलत होते. एनडीएच्या १५१ व्या दीक्षांत संचलनाची मानवंदना त्यांनी स्वीकारली. या तुकडीतल्या एकूण ३६९ छात्रसेना अधिकाऱ्यांना सशस्त्र दलांमध्ये प्रवेश देण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे देशाच्या संरक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल होत असल्याचं सिंग म्हणाले...

होल्ड.. बाईट - राजनाथ सिंग

<><><><><><>

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाबाबत चर्चा करण्यासाठी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आज चेन्नई इथं द्रमुकचे अध्यक्ष एम के स्टालिन यांची तसंच मुंबईत राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेणार आहेत. मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला विरोध करण्याचा निर्णय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काल इंडिया आघाडीच्या बैठकीनंतर जाहीर केला. यापूर्वी वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या विशेष अधिवेशनात इंडिया आघाडीच्या घटक पक्षांनी तसंच इतर विरोधी पक्षांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केलं होतं. त्यानंतर विधेयकात सरकारनं सुधारणा केली असून आता इंडिया आघाडीतून बाहेर पडलेल्या द्रविड मुन्नेत्र कळघम् पक्षाने विधेयक मांडण्याला सशर्त पाठींबा जाहीर केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं याबाबत अद्याप ठोस भूमिका जाहीर केलेली नाही. मात्र काल कांग्रेसने बोलावलेल्या बैठकीला त्यांचे खासदार उपस्थित नव्हते. त्यांच्या पक्षानं विधेयकाला पाठिंबा दिला तरीही इंडिया आघाडीतलं त्यांचं स्थान कायम राहील, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी काल वार्ताहर परिषदेत स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

'फिट इंडिया संडे ऑन सायकल' उपक्रमाची शतकपूर्ती आज देशभरात साजरी होत आहे. यापार्श्वभूमीवर,माय भारतच्या सहकार्यानं प्रत्येक जिल्ह्यात युवकांच्या सायकल यात्रा निघाल्या आहेत. देशभरात शंभर निवडक ठिकाणी शंभर ऑलिम्पिक खेळाडू या उपक्रमात सहभागी झाले. 'इंडिया रेडी फॉर ऑलिम्पिक्स' ही यंदाच्या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे. यानिमित्त पुण्याजवळ पिंपरी-चिंचवड इथून आज सकाळी केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या प्रमुख उपस्थीतीत भव्य सायकल फेरी काढण्यात आली. फीट इंडिया अभियाना अंतर्गत ही मोहीम १७ डिसेंबर २०२४ रोजी सुरु झाली होती.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात क्राईस्टचर्च इथं सुरु असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी न्यूझीलंडनं भारताचा पहिला डाव २४६ धावांवर रोखत ११० धावांची आघाडी मिळवली आणि सामान्यावर आपली पकड आणखी मजबूत केली. ७ बाद ११७ अशा बिकट परिस्थितीतून ध्रुव जुरेलनं तळाच्या फलंदाजांसोबत भागीदार रचत भारताचा डाव सावरला. त्यानं झुंजार फलंदाजी करत ८८ धावा केल्या. न्युझिलंडकडून कायले जेमिसननं सर्वाधिक ४ बळी मिळवले. दरम्यान, आकाशदीपला फलंदाजी करताना डोक्याला चेंडू लागून दुखापत झाल्यानं उर्वरित सामन्यात खेळता येणार नाही. त्याचा बदली खेळाडू म्हणून प्रसिद्ध कृष्णाचा संघात समावेश केला आहे. आज दिवस अखेरीस न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात ३ बाद १३३ धावा झाल्या असून न्यूझीलंड २४३ धावांनी आघाडीवर आहे.

<><><><><>

भारतीय महिला हॉकी संघानं चीनचा ३-१ असा पराभव करून चौथ्यांदा महिला आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच विजेतेपद पटकावलं आहे. काल भोपाळ इथं झालेल्या अंतिम सामन्यात दीपिकाने दोन, तर इशिकाने एक गोल नोंदवला. दीपिकाला सर्वोत्तम खेळाडूचा मान देण्यात आला. या विजयामुळे भारत महिला हॉकी संघ हा आशियाई अजिंक्यपद स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक विजेतेपद मिळवणारा संघ ठरला आहे.

<><><><><>

झारखंडच्या रामगढ जिल्ह्यात आज सकाळी रस्ते अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला. रांची पटना महामार्गावरच्या पैंकी गावाजवळ भरधाव वाहनांची टक्कर झाल्यानं हा अपघात

झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदत देण्याची घोषणाही प्रधानमंत्र्यांनी केली. अपघाताचा पोलीस तपास सुरु आहे.

<><><><><><>

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथं मॅनहॅटन बीचजवळ समुद्रकिनाऱ्यापासून काही अंतरावर काल भूकंपाचे दोन धक्के जाणवले. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री अकराच्या सुमारास पाच रिक्टर स्केल तीव्रतेचा आणि सकाळी पावणे बाराच्या सुमारास साडेचार रिक्टर स्केल इतक्या तीव्रतेचे हे धक्के होते. शहरातल्या कोणत्याही पायाभूत सुविधांची हानी झालेली नसल्याचं तिथल्या अग्निशमन दलानं म्हटलं आहे.

<><><><><><>

तैवानमधल्या बहुसंख्य मतदारांनी देशातला अणुउर्जा प्रकल्प टप्प्याटप्प्याने बंद करण्याचं धोरण रद्द करण्याच्या बाजूने कौल दिला आहे. सार्वजनिक निवडणुकांबरोबर काल तैवानमध्ये सार्वमताची प्रक्रियाही झाली. या प्रक्रियेत विरोधी पक्ष नॅशनलिस्ट पार्टीने अणुउर्जा प्रकल्प बंद करण्याविषयी मत विचारलं होतं. अणुउर्जा प्रकल्प बंद केल्यास तैवानची अर्थव्यवस्था मजबूत व्हायला मदत होईल, असा युक्तिवाद विरोधी पक्षानं केला होता. मात्र, अणुऊर्जेच्या भविष्यावर पुनर्विचार करण्याचा राजकीय जनादेश सत्ताधारी डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी सरकारला मिळाला आहे.

//<><><><><><>//